श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ८ वें ] [ अंक ३-४

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका
मोहमुद्गर.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.

महाराजांचे अनुभव ... ... ... २५—३१
पाश्चात्यांचा प्रचलित धर्म ... ... ... ३२—४०
केकावली ... ... ... ... १४४-१७६
पाश्चात्यांची दिखाऊ सुधारणा ... ... १—१४
महाराजांचे अनुभव ... ... ... १५

# विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावली** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" ही टीका श्री साई लीलेच्या ४--५ अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

ही टीका सुमारें साठ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली होती, आणि आजमितीस हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ झाला आहे. तरी ग्राहक याचा फायदा घेऊन ऋणी करतील अशी आशा आहे.

व्यवस्थापक—**श्रीसाई लीला**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड

—प्रकाशक

असो. बाबा हे परम पुरुष व राधाकृष्ण आई ह्या त्यांनीं कांहीं काल मुमुक्षु भक्तांची दुसरी कसोटी (पहिली दक्षिणा) पाहाण्याकरितां निर्माण केलेली माया (कामिनी). राधाकृष्ण आई जावत्कालपर्यंत शिरडीस होत्या तावत्कालपर्यंत बाबांचा भक्तवृंद एक वेळ बाबांचें दर्शन घेण्यास चुकेल, परंतु राधाकृष्ण आईचें दर्शन घेण्यास चुकावयाचा नाहीं. सर्वांचेंच मन पापानें भरलें असेल असें मी म्हणत नाहीं, किंवा यांत कोणत्याही भक्ताची किंवा राधाकृष्ण आईची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निंदा करण्याचा अथवा त्यांना दोष देण्याचा माझा हेतु आहे असें नाहीं. परंतु शिरडीची अधिष्ठात्री देवता जी बाबा त्यांच्याकडे लक्षसर्वस्व लागण्याऐवजीं राधाकृष्ण आईकडेच पुष्कळसें लक्ष खेंचलें जात असे.

भक्त या नात्यानें बाबांचा व राधाकृष्ण आ चा काय संबंध असेल तो बाबांनाच माहीत. पण आपण विकारवश होऊन राधाकृष्ण आईकडे जात नाहीं असें दर्शविण्याकरितां कांहीं भक्त तर आपल्या विचारशक्तीला बेसुमार ताण देऊन त्यांना बाबांच्याच कोटींत बसवीत असत.

कांहीं असो. शिरडीस जावयाचें तें बाबांच्याकरतां, राधाकृष्ण आईकरतां नव्हे हें कोणीही कबूल करील. इतकेंही असून भक्तवृंदाच्या मनाचा कांटा विशेषेंकरून जो राधाकृष्ण आईकडे झुकत असे तो कां ?

या सर्व विवेचनावरून असें दिसून येईल कीं, शिरडीस येणाऱ्या भक्तवृंदांत खरा मुमुक्षु कोण ह्याची परीक्षा पाहाण्याकरतां दक्षिणा व राधाकृष्ण आई (कनक व कांता) या दोन कसोटया किंवा चाळण्या बाबांनीं निर्माण करून ठेविल्या होत्या. ह्या दोन्ही कसोटयांच्या कसास जो उतरेल किंवा दोन्ही चाळणींच्या वर जो राहील म्हणजे जो मागितलेली दक्षिणा श्रद्धेनें देईल व ज्याचें लक्ष राधाकृष्ण आईकडे खेंचलें जाणार नाहीं तोच खरा मुमुक्षु.

भक्ताकडून मागून घेतलेल्या दक्षिणेचा विनियोग बाबा जसा आपल्या उपभोगाकरितां करीत नसत तसेंच राधाकृष्ण आईसही तूं हें अमुक काम माझ्याकरतां कर किंवा माझ्या अमुक कामाची तूं व्यवस्था ठेव असें कधींही

सांगत नसत. इतकेंच नव्हे तर त्यांचें ते मुखही पाहात नसत किंवा त्यांच्याशी एक शब्दही बोलत नसत, व त्यांना मशीदींतही येऊं देत नसत.

यावरून राधाकृष्ण आईस बाबांनीं आपल्याजवळ कां ठेविल्या हा... त्यांच्यावरील आरोप असमंजसपणाचा, अविचाराचा व अर्थशून्य आहे अशी खात्री होईल.

पहिल्याच पानावर शिरोभागीं उद्धृत केलेला स्रग्धरा–वृत्तांतील श्लोक लेखकाचा आहे. सरस्वतीभूषण, मीमांसाशास्त्रकोविद, मीमांसाशास्त्रप्रसारक, मीमांसा विद्यालय संस्थापक, गीर्वाण भाषाप्रवीण, गीर्वाण भारत्युच्चाध्यापक, पुण्यपत्तनस्थ पंडित वामन रामचंद्र शास्त्री किंजवडेकर यांनीं तो श्लोक पाहू... त्याचा सारांश थोडक्यांत आपल्या मधुर गीर्वाण भाषेंत लिहून मजकडे पाठ... विला आहे. तो मी जशाचा तसाच प्रेमी वाचकांकरतां खालीं देत आहे.

**१ पुत्रैषणायाश्च, वित्तैषणायाश्च, लोकैषणायाश्च व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति ॥**

( बृहदारण्यकोपनिषदि ४–४–२२ )

२ नगरसंज्ञकप्रांतविभागे सुप्रथतं नाम "शिरडी" इति क्षेत्रम्। यत्र पुरुष वराणां ज्ञानात्मनां "श्रीसाइबाबा इत्यभिधां गतानां निवासः सम... भूत। तत्र केचिन्मुमुक्षवः एकान्ते सुखमास्थितानां तेषां चरण सरसिजे ज्ञान... सव पिपासया बम्भ्रम्यमाणाः द्विपदाः षट्पदायमानाः संगच्छन्त आसन्। समतीतेऽप्येयमने ह्सि तत्र बहूनां जनानां मेळनक्रमः समारब्धः । तत... पुरुषप्रवरैरेतैः संसारदावानल विदग्धानां काकविष्टावद्वैराग्यं प्राप्तानाम तथ... भूतानांच परीक्षणं कार्यमिति तत्रैक्यं युवत्यधिकृतं राधाकृष्ण मंदिरं योग... मायया निरमायि ।

अपरं च दक्षिणाग्रहणमपि प्रारब्धं-सोयमत्राभिप्रायः । यः कि... वित्तैषणाया निर्मुक्तः स एव वित्तं त्यक्तुं प्रभवति । अर्हति च ज्ञानमार्गमाक्रमि... इति दक्षिणारूपेण द्रव्यग्रहणं समारब्धम् ।

अपरं च दारैषणाया निर्मुक्तेनैव मुमुक्षा संपादनीयेति मंदिरं युवत्यायुतं परीक्षणार्थं समपादि । एवं मुमुक्षुपरीक्षणार्थं एते द्वे युवतिः दक्षिणा निकषभूते संस्थापिते तदेतत्सत्पुरुष रहस्य मजावन्त एव बहवः राधाकृष्णमंदिरे न्युष्य युवतिसेवाप्रकार्षुः ।

केचनद्रव्यलोभमपरित्यजन्त एव दक्षिणां न दत्तवन्तः । एतेन एकान्ते वसतामपि तेषां जनसंमर्दः प्राग्भूत् । परमायत्यां तु जनसंमर्दे वसता मप्येकान्तोऽभूदिति चित्रं चरित्र मस्मिन्यध्ये कविना मुमुक्षुणा केषांचिदर्धमुग्धानां मेत्रेऽञ्जनं निरलेपि ।

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील पश्चिम विभागांत पाचोरे म्हणून एक तालुका आहे, व पाचोरे हा गांव तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. कै. नाना-साहेब चांदोरकर हे त्याच जिल्ह्यांत दुसऱ्या एका तालुक्यावर मामलेदार होते. पाचोऱ्यापासून सुमारें ८–१० मैलांवर पद्मालय म्हणून एक ठिकाण आहे. तेथून सुमारें दीड मैल अंतरावर रानांत एक वंदनीय सिद्ध पुरुष श्री. गोविंदबुवा म्हणून राहात असत. गोविंदबुवानीं तेथें एक भव्य व दर्शनीय असें श्रीगणपतीचें मंदीर बांधलें. व त्यास १०० तोळे सोन्याचा कळस चढविला. हें मंदीर जंगलांत होतें. व गोविंदबुवा या मंदिरापासून थोड्याशा अंतरावर एका लहानशा मठींत राहात असत. दररोज प्रातःकाळीं मंदिरांत येऊन तेथील गजाननाची पूजाअर्चा आटोपून आल्या-गेल्याचा योग्य परामर्ष घेत असत. त्याची जेवणाखाण्याची व निजण्याबसण्याची सर्व सोय तेथें करीत. व रात्रीं १० वाजतां मंदिराचे दरवाजे बंद करून मठींत परत जात. स्वतः महाराज रोज दोन्ही वेळ मिळून फक्त १८ तोळे चहा घेऊन राहात. जेवणाचें फराळाचें निरशनाचें वगैरे कांहीं खात नसत.

एकदां नानासाहेबांस अशी उत्कट इच्छा झाली कीं, या गोविंद-महाराजांचें दर्शन घ्यावें. त्यांनीं आपला मनोदय त्यांच्या नित्य बैठकींत अस-

णाऱ्या २–३ गृहस्थांस कळविला व पद्मालयास जाण्याचा दिवस नक्की करून पाचोरे मामलेदार साहेबांस आम्ही अमुक दिवशीं अमक्यावेळीं अमक्या गाडीनें पद्मालयास जाण्यासाठीं पाचोरें स्टेशनावर येतों, त्यावेळीं आपला तांगा तेथें हजर ठेवावा, असें पत्र लिहिलें.

ठरल्या दिवशीं नानासाहेब वगैरे मंडळी पाचोऱ्यास जाण्याकरतां ज्या स्टेशनवर बसावयाचें त्या स्टेशनवर आली. परंतु तेथें त्यांना येण्यास उशीर लागल्यामुळें यांची ठरलेली गाडी चुकली व ते नंतरच्या गाडीनें पाचोऱ्यास आले. पाचोरे मामलेदारसाहेबांनीं ठरलेल्या गाडीच्यावेळीं स्टेशनावर तांगा पाठविला. त्या गाडींत नानासाहेब वगैरे मंडळी नाहींत असें पाहून तांगेवाला तांगा परत घेऊन गेला. दुसऱ्या गाडीनें ही मंडळी आली. त्यांनीं स्टेशनवर तांगा आला होता काय म्हणून चौकशी केली. पूर्वीच्या गाडीनें येणारी मंडळी आली नाहींत असें पाहून तांगेवाला परत गेला असें स्टेशनवर असलेल्या लोकांनीं नानासाहेबांस सांगितलें. नानासाहेबांची गाडी चुकल्यामुळें ते दुपारीं येण्याऐवजीं पाचोरा स्टेशनवर सायंकाळीं आले. तेथून पद्मालयास जाण्याचा रस्ता म्हणजे राज-रस्ता नसून जंगलांतील आडरस्ता. नानासाहेब वगैरे मंडळीनीं तो रस्ता कधीं पाहिलेला नाहीं व नानासाहेबांस ८-१० मैल चालण्याचीही कधीं संवय नाहीं. परंतु पायीं जाण्याखेरीज दुसरें साधनच नाहीं असें आढळून आल्या-वर त्या सर्वांनीं पद्मालयास पायीं जाण्याचें ठरविलें. व त्याप्रमाणें लगेच एक वाटाड्या बरोबर घेऊन ते चालूं लागले. रात्रींचा ७-८ वाजण्याचा समय. रात्र काळोखी, जंगलचा दगडाळ व उंचसखल रस्ता. सकाळीं एक वेळ भोजन झालेलें. बरोबर फराळाचे किंवा खाण्याचे पदार्थ कांहीं नाहींत. अशा स्थितींत ते गप्पागोष्टी बोलत निघाले. पण ५-६ मैल गेल्यावर मात्र अतीशय थकले. नानासाहेबांना पुढें पाऊल टाकवेना. ते सर्वजण तेथेंच रस्त्यांत एके ठिकाणीं बसले, व विचार करूं लागले कीं अशा वेळीं परत जाण्यांतही मतलब नाहीं व पुढें पद्मालयालाही जाण्यांत अर्थ नाहीं. कारण पाचोरे फार लांब. भलत्याच वेळीं आपण तेथें पोंचणार. पद्मालय जवळ, पण आपण फार थकलों असल्यामुळें

आतां आपल्यास १० वाजण्याचे आंत तेथें पोंचतां येणार नाहीं. कारण १० वाजतां महाराज मंदीर बंद करून आपल्या मठींत निजावयास जातात. मग आपली जेवणाखाणाची व निजण्याची सोय तेथें जंगलांत लागणार कशी ? सकाळीं लवकर भोजन झालें असल्यामुळें त्यांना खूप ताण बसला व चालण्याच्या श्रमामुळें त्या सर्वांना खरपूस भूक लागली. पण करणार काय ? खरोखरच अशा वेळीं श्री सद्गुरुमाउलीवांचून कोणास दया येणार व कोणाचा जीव कळवळणार ? श्री सद्गुरुमाऊलीवर नानासाहेबांची निष्ठा बलवत्तर. बसल्या बसल्या व चालतां चालतां श्रीगुरुमाउलीचा धांवा करण्याचा मनांतल्या मनांत सपाटा चालविला. थोडा वेळ चालावें—थोडा वेळ बसावें असा क्रम चालला. मध्येंच उभें राहावें व म्हणावें कीं, "बाबा मला आतां जेवणाखाण्यास कांहीं न मिळालें तरी चालेल, एक मोठा गडवाभर चहा मिळाला म्हणजे रात्रीच्या रात्र काम भागेल. परंतु हें व्हावें कसें. गोविंद महाराजांना ही गोष्ट सांगणार कोण व महाराज माझ्यासाठीं १० वाजल्यानंतर नित्यनेमाचें अतिक्रमण करून मंदिरांत काय म्हणून राहातील व माझी चहाची तजवीज करून कां करून ठेवतील ? बाबा, आपणच जर मनांत आणलें तर ही दिसण्यांत असंभवनीय दिसणारी गोष्ट संभवनीय होण्यास अवधि कसला !"

भगवान ज्ञानेश्वर महाराज श्रीमद्भगवतद्गीतेच्या १५ व्या अध्यायाच्या प्रारंभीं श्री ज्ञानेश्वरी भाष्य प्रस्तावनेच्या २३ व्या ओवींत म्हणतात कीं—

**आधणीं घातलिया हरळ । होती अमृताचे तांदुळ ।**
**जरी भुकेची राखे वेळ । श्री जगन्नाथ ॥**

खरोखरच पूर्णब्रह्म जगन्नाथ बाबा नानासाहेबांची क्षुधेमुळें अशी व्याकूळ झालेली स्थिति पाहून अंतःकरणांत कळवळले. त्यांना नानासाहेबांच्या भुकेची वेळ राखावयाची होती. व तीही श्री गोविंद बुवांसारख्या पुण्यपुरुषाच्या हातून ! मग काय कमी ? बिन तारेच्या तारायंत्रास किंवा ध्वनिवाहक यंत्रास तारा जरी नसल्या तरी दोहीकडे दोन स्टेशनें, यंत्रें, ऑफिसें व बातमी घेणारीं किंवा ध्वनि ऐकणारीं माणसें तरी लागतात. आधुनिक आधिभौतिक ज्ञानाच्या

जोरावर मानवजातीच्या सुधारणेची जी मजल येऊन ठेपली आहे ती इतकीच. व याच सुधारणेचे आम्ही गोडवे किती गातों, कौतुक किती करतों, तिच्या प्रवर्तकास धन्यवाद किती देतों व अशा सुधारणेच्या काळांत आम्ही जन्मास आलों म्हणून आम्ही आपल्यास धन्य किती मानून घेतों. परंतु ज्या परमात्मज्ञानापुढें हें ज्ञान म्हणजे दर्यामें खसखस सुद्धां शोभणार नाहीं, त्या पूर्णब्रह्म संतांच्या ज्ञानाचें वर्णन कोण करणार ? त्यांना इकडची बातमी लाखों मैलांवर किंवा सात समुद्रांच्या पलीकडे पोंचविण्यास यंत्रांची उभारणी करावी लागत नाहीं, स्टेशनें बांधावीं लागत नाहींत, बातमी घेण्यास माणसें ठेवावीं लागत नाहींत, ऑफिसें उघडावीं लागत नाहींत किंवा कोणत्याही प्रकारचा गाजावाजा करावा लागत नाहीं.

काय चमत्कार ! श्रीसद्गुरुमाउलीच्या कानावर आपलें भुकेचें गाऱ्हाणें घालीत घालीत व दमल्या थकल्या पायांवर लवकर चालण्याबद्दल प्रोत्साहन देत देत रात्रीचे दहा वाजल्यानंतर काळोखांतून पद्मालयाचे मंदिरानजीक येतात न येतात इतक्यांत ज्ञानघन श्री गोविंदमहाराजांची मूर्ति गरमागरम मधुर, स्वादु, अमृततुल्य चहानें भरलेली मोठी चरवी हातात घेऊन मंदिरद्वारांतून बाहेर येऊन "नाना आलास ?" म्हणून महाराजांनीं नानासाहेबांस विचारलें. होय, आलों असें म्हणून नानासाहेबांनीं व बरोबरच्या सर्व मंडळीनीं महाराजांस वंदन केलें. नंतर नानासाहेब बोलले कीं महाराज, आपण आज या वेळीं येथें कसे? महाराज म्हणाले, "अरे, नाना फार लांबून पायीं चालत येत असल्यामुळें अतिशय थकला आहे, त्याला फार भूक लागली आहे. करितां त्यांच्याकरितां एक मोठा तांब्याभर चहा तयार करून ठेव" असें आतांच बाबांकडून सांगणें झाल्यामुळें तुला मी हा चहा घेऊन आलों आहे. अहाहा ! काय हें अद्भुत अंतरसाक्षित्व ! काय ही उभय ज्ञानमूर्तींची भाषा ! केवढा हा बाबांबद्दल गोविंद महाराजांस आदर ! व केवढा बाबांच्या भक्तांबद्दल गोविंद महाराजांस कळवळा ! या सर्व गोष्टीबद्दल नानासाहेबांस अत्यंत आश्चर्य वाटून त्यांना अत्यानंद वाटला. व श्रीसद्गुरु माऊली बाबांच्या विश्वव्यापकतेबद्दल प्रेमातिशय कौतुक वाटलें. महाराजांनीं सर्वांची निजण्याची

सोय मंदिरांत केलीच होती. मग नानासाहेब आदीकरून सर्व मंडळींनीं महाराजांनीं दिलेला चहा त्यांचा पुण्य प्रसाद मानून श्रद्धा व प्रेमपूर्वक मोठ्या आदरानें त्याचा यथेच्छ समाचार घेतला. चहा सर्वांना पुरून उरला होता. सर्व मंडळी नंतर झोपीं गेली व महाराज आपल्या मठींत गेले. दुसरे दिवशीं मंडळी मंदिरांतील भोजनप्रसाद घेऊन परत आपल्या गांवीं गेलीं.

ज्या विश्वसृट् विश्वाश्रय, विश्वसंहारक विश्वरंगभू नाटयाचार्य बाबांच्या प्रेरणेनें हा लेख लिहिण्याची स्फूर्ति झाली त्या श्रीसद्गुरु साई गंगाधराच्या पुण्य, दिव्य व पवित्र चरणसरोवरही श्रद्धासमन्वित, अनन्य प्रेमभावानें, शिरोभागीं लिहिलेला श्लोक, त्याखालीं लिहिलेला मजकूर व शेवटीं लिहिलेला अनुभव हें त्रिदल अति विनयपूर्वक अर्पण करून आपली रजा घेतों.

ठाणें
ता. ४–६–३० | **बाबांचें बाळ**

# पाश्चात्यांचा प्रचलित धर्म.

सन १९१७ च्या मे महिन्यांतील गोष्ट. श्रीसाई बाबांची माध्यान्हीची आरती नुकतीच आटोपली होती. आरति झाल्यावर एका चांदीच्या झारीतून बाबांचें तीर्थ देण्यांत येत असे. तें तीर्थ शिरडीस राहाणारी एक ब्राह्मण सुवासिनी स्त्री सर्वांना देत असे.

माझ्या स्नेहाची बायको आणि मुलगा त्या वेळीं हजर होतीं. तीर्थ देतांना कांहीं कारणानें म्हणा, माझ्या स्नेह्याच्या बायकोला त्या बाईनें तीर्थ दिलें नाहीं. त्यामुळें तिच्या मनाला किंचित् विषाद वाटला. हा विचार तिच्या मनांत येतां क्षणींच बाबा बैठकीवरून चटकन उठले आणि त्या गर्दीतून त्या ब्राह्मणबाईला म्हणाले "आये, तीर्थ इकडे आण. अग ! सोंवळओंवळ कसलं घेऊन बसलीस!" आपल्या एका हाताच्या बोटांनीं दुसऱ्या हाताचें कातडें पकडून म्हणाले "हें बघ ! या कातड्याखालीं सगळे सारखे आहेत !" असें बोलून स्नेह्याच्या बायकोला जवळ बोलावून तिला आपल्या हातांनीं त्या झारींतून तीर्थ दिलें.

श्री साईबाबांनीं सब् गोलंकर करण्याच्या हेतूनें अथवा वृत्तीनें हें कृत्य केलें नाहीं. श्री साईबाबांची केव्हांही आणि कधींही तशी शिकवणूक नव्हती. परंतु मी उच्च तूं नीच, ही वृत्ति त्यांना पसंत नव्हती. लहानथोर, गरीब श्रीमान् मनुष्यादि यत्किंचित किडी, काडीमध्यें देवाची वस्ती सारख्या प्रमाणांत परिपूर्ण आहे. जेथें तेथें देव भरून राहिला आहे आणि म्हणून कोणी कोणाचा द्वेष व घातपात करूं नये यावर त्यांचा फारच भर असे. खरें वर्तन ठेवा. देव खऱ्याचा आहे. देवाला लांचलुचपत, लबाडी, छिन्दळकी पसंत नाहीं असें ते वारंवार बोलून व गोष्टी सांगून शिकवीत असत. ज्यांची जशी भूमिका त्याप्रमाणें त्यांच्याजवळ बसलेल्या मंडळीपैकीं जो तो आपल्याला उचित असा बोध घेत असे.

हें केवळ श्रीसाईबाबांच्या पायांपाशीं बसून माझ्या मित्रानें पाहिलें आणि अनुभविलें असें नाहीं. पुढें सन १९२० सालीं बडोद्याला त्याच्या यजमानाच्या घरीं असतांना अशीच एक गोष्ट घडली.

त्या दिवशीं श्री माळसरचे महाराज तेथें आले होते. ते बाह्य वर्तनानें पूर्ण वैष्णव होते. वर्णाश्रमधर्म सक्त रीतीनें पाळण्याविषयीं हमेशा त्यांचा कटाक्ष आणि शिकवण असे. त्या दिवशीं महाराजांसमोर मित्राचे यजमान मध्यें व त्याच्या उजव्या बाजूला यजमानांचा एक आप्त असे सर्व बसले असतां, महाराजांनीं वर्णाश्रमधर्मांचा महिमा व उपयुक्तता याविषयीं एक सुंदर विवेचन केलें.

कांहीं वेळानें ते तिघेजण दुसऱ्या खोलींत गेल्यावर तो आप्त मित्राला "हें पाहा, महाराज हें सर्व तुम्हाला उद्देशून बोलले." मित्र हांसून म्हणाला "महाराजांना सर्व कांहीं कळतें. त्यांच्या बोलण्याचा खास उद्देश तुमच्या साठींच असावा. कारण आपण घरीं सोवळें ओवळें, पूजा वगैरे सर्व आचार पाळून बाहेर वर्तन अजिबात निराळें ठेवितां, त्यामुळें तुम्ही स्वतःला फसवीत आहांत. जर वर्णाश्रम धर्माप्रमाणें तुम्हाला वागावयाचें असेल तर तसें करूं नये. केवळ दांभिक कवाईत जर कराल तर स्वतःला विशेष आणि विशेष फसवून त्याचा परिणाम तुमच्या घरच्या मंडळीवर आणि मुलांलेंकरांवर झाल्याशिवाय राहाणार नाहीं. आपण स्वतःला व आपणांवर अवलंबून असणाऱ्या सर्वांना या फसवणुकीमुळें शरीरानें, मनानें व बुद्धीनें कमकुवत कराल. आणि त्यांचा परमेश्वरावर असलेला विश्वास लुप्त होईल. चला आतांच आपण महाराजांपाशीं जाऊन याचा खुलासा घेऊं" असें बोलून मित्र व ते दोघे महाराजांपाशीं गेले. मित्र महाराजांपाशीं विनम्र भावानें बोलला: "महाराज ! जब मनकी ऐसी बालंबाल खातरी होती है. के श्री प्रभुजीकी वस्ती सबके हृदयों में है, और श्री प्रभुजी ए आकृति के आंखोंसें आपने तरफ साक्षात् देखते है, तब मै उंचा और वो नीच ऐसा विचार आनेसे श्री प्रभुजीकी अवहेलना होती है !" महाराज म्हणाले "जरूर ! मै जो प्रवचन किया ओ तेरेवास्ते नहीं. पण अपना ए स्नेही के वास्ते. क्यों के ए वर्णाश्रम धर्म की थट्टा करता है."

"सारांश काय कीं, वर्णाश्रमधर्म पाळा, वर्णाश्रम धर्म पाळा, म्हणून आपण एकसारखी ओरड करीत आहोंत, आणि दिवसेंदिवस घराबाहेर एक

व आंत एक असें दुटप्पी असत्यपूर्ण वर्तन ठेवीत असल्यामुळें आपण आपल्या मुलालेंकरांसह सर्व दीनदुबळ्या मानसिक व शारीरिक स्थितीप्रत जात आहोंत.

वर्णाश्रम धर्म स्वावलंबी कसें व्हावें, आत्मविश्वासयुक्त वर्तन ठेवून इतर वर्णांना आपलेच घटकावयव आहेत असें समजून आपला व त्यांचा सर्वांचा आपल्या बरोबर सारखा उत्कर्ष व्हावा हें पूर्णपणें शिकवितो. त्याच्याच आधारावर धनगर, कोळी, महार, भिल्ल वगैरे डोंगरी किल्ल्यांच्या आणि त्यांच्या खिंडारांत राहाणाऱ्या दीन प्रजेला पूर्णपणें आपलेंसें करून श्री शिवाजी महाराजांनीं आमचें अमूल्य हिंदुत्व राखलें, इतकेंच नव्हे तर मुसलमानांनादेखील आपलेंसें केलें. ही या दैवी पुरुषानें वर्णाश्रमधर्माची खरी किल्ली जाणली व हस्तगत केली.

या वर्णाश्रम धर्माची घडी पुढें विस्कळीत केल्यामुळें आत्मविश्वास लुप्त झाला. परस्परांविषयीं संशयी मनें व वर्तनें उत्पन्न झालीं, आणि मोठ्या परिश्रमानें उभारलेला मराठेशाहीचा डोलारा कोलमडून ढांसळला.

आतां पुढें कसें ? हा प्रश्न आपण होऊन उभा राहातो. त्याला प्रत्युत्तर हेंच कीं, प्रथमतः गेलेला आत्मविश्वास हर युक्तिप्रयुक्तीनें पुन्हा प्राप्त करून घेतला पाहिजे. तो प्राप्त करतांना संतांच्या शिकवणींवर आणि वचनांवर विश्वास ठेवून त्या आधारांनीं सत्ययुक्त वर्तन ठेविल्यास फारच उत्तम.

तसें करणें नसल्यास व नामस्मरण, भजन वगैरे साधनें निरुपयोगी वाटत असल्यास, आणि सद्गुरु वगैरे कोणी नको, आमचें आम्ही पाहून घेऊं असा विश्वास योगमार्गाच्या शिकवणीप्रमाणें तरी आपल्या स्वतःमध्यें उत्पन्न केला पाहिजे. तो जर तुम्ही न मिळवाल, आणि केवळ दांभिक आचरण चालू ठेवाल तर तुमच्या हातून कांहीं कार्य होणार नाहीं.

महात्मा गांधींनीं संतांच्या वचनांच्या आधारावर पूर्ण भिस्त ठेवून, जनतेंत आत्मविश्वास जागृत होण्यासाठीं आज कित्येक वर्षें शारीरिक आणि

मानसिक तपश्चर्या करून जें आत्मबल प्राप्त करून दुसऱ्यांना देण्यासाठीं जी अपूर्व कामगिरी केली व करीत आहेत तिचें प्रत्येकानें अवलोकन करून आपल्या अंतरंगांत त्याचें सूक्ष्म विवेचन करावें.

हें आत्मबल प्राप्त करून घेण्यासाठीं सर्व संतांच्या शिकवणीचें जें मूळ मर्म **सत्य** त्यावर महात्माजींचा पूर्ण कटाक्ष. आपले साईबाबा देखील टाहो फोडून रात्रंदिवस या **सत्यावरच** पूर्णपणें अवलंबून राहा असें शिकवीत नव्हते काय? श्रीसाईबाबांचा अंत आपणाला कधींही लागावयाचा नाहीं. तरी पण महात्मा गांधी हें एक **सत्यान्वेषि** अद्वितीय रत्न आपणां सर्वांपुढें सध्यां हजर आहे. सत्य वर्तनानें महात्माजींनीं आत्मबल प्राप्त करून घेतलें आहे आणि त्या आत्मबलाच्या आधारानें आपल्याच काय, पण सर्व जगाच्या नाड्या ते हालवीत आहेत हें आपण प्रत्यक्ष पाहात आहोंत.

काय हा सत्याचा प्रभाव! काय हें अफाट सामर्थ्य!

आपण आतां पाश्चात्यांच्या प्रचलित धर्माचा विचार करूं. त्यांच्यांत निरनिराळे धर्मपंथ आहेत. निरनिराळ्या जाती आहेत. त्यांच्या जातींजातींत वैमनस्यें आहेत. तरी पण सध्यांच्या बिकट स्थितींत त्यांच्या प्रत्येक राष्ट्राच्या नेत्यांची व त्यांतील प्रत्येक स्त्रीपुरुषादि व्यक्तींची आपलें राष्ट्र जीवंत कसें राहील, इतकेंच नाहीं तर त्याचा उत्कर्ष कसा होईल हीच विवंचना प्रमुखत्वेंकरून रात्रंदिवस चालू आहे. भौतिक शास्त्रांचें अध्ययन सतत करून त्या शास्त्रांच्या शोधांपासून आपल्या जनतेचा फायदा कसा होईल व तिचा बचाव दुराचारी शत्रूंपासून कसा करतां येईल हाच त्यांचा प्रचलित धर्म आहे.

त्यांच्या धर्मशिकवणींत आपल्या श्रीमद्‌भगवद्गीतेसारख्या अत्यंत उदात्त शिकवणी नसल्यामुळें भौतिक शास्त्रांच्या शोधांमुळें ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं ते दिवसेंदिवस साशंक होत चालले आहेत. त्यामुळें त्यांना त्यांचीं धर्मबंधनें निरुपयोगी वाटत आहेत. पिच्छेहाट करणाऱ्या धर्मतत्वांची आणि तसें शिकविणाऱ्या धर्मगुरूंची त्यांना आवश्यकता वाटत नाहीं.

तरी पण त्यांचें स॑ लक्ष त्यांची जनता कोणत्या उपायांनीं ह्यात राहून तिचा उत्कर्ष कसा होईल या मुख्य मर्माकडे आहे. त्यामुळें न जाणतां प्रत्यक्ष रीतीनें ते जनताजनार्दनरूपी श्रीहरीची सेवा करीत आहेत, आणि त्याप्रीत्यर्थ पाहिजे तो स्वार्थत्याग करण्याला व आत्मभोग देण्याला ते मुळींच आगेपिछे पाहात नाहींत.

श्री मद्‌भगवद्गीता त्यांनीं अध्ययन न करतां जाणिली आणि व्यवहारी उपयोगांत आणिली आणि श्री गीतेचीं पारायणें आणि अध्ययनें करूनही तिचें अंतिम मर्म आम्ही ओळखीत नाहीं असें अत्यंत खेदयुक्त अंत:करणानें कबूल करावें लागत आहे. असें कां ? तर आपण आपल्या आत्मविश्वासाला मुकलों आहोंत म्हणून !

पाश्चात्यांचें तसें नाहीं. त्यांचा आत्मविश्वास लुप्त होणें तर बाजूस राहो, पण निसर्गापासून तऱ्हेतऱ्हेचे शोध लावून, त्यांच्या द्वारें योग्य तीं साधनें व यंत्रें निर्माण करून आपल्या जनतेचें संरक्षण कसें होईल व तिचा उत्तरोत्तर उत्कर्ष कसा होत जाईल इकडे त्यांचें एक निमिष देखील व्यर्थ न जाऊं देण्याकडे पूर्ण लक्ष आहे.

शास्त्रीय शोध करणारे, व विद्या शिकविणारे आणि जनतेच्या उत्कर्षासाठीं झटणारे हे जसे त्यांचे ब्राम्हण, तसेंच देशासाठीं प्रसंगोपात् प्राण देण्यासाठीं उद्युक्त हे त्यांचे क्षत्रिय. देशाचा व्यापाररोजगार वृद्धिंगत होऊन देश धनसंपन्न करण्याकडे अहोरात्र झटणारे त्यांचे मुत्सद्दी व धनको हे जसे त्यांचे वैश्य आणि काम करणारे हे त्यांचे शुद्र अशी त्यांची वर्णव्यवस्था आहे. तरी पण या व्यवस्थेंतील कोणीही ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व क्षुद्र त्या राष्ट्राच्या अति उच्चतम अशा स्थितीप्रत स्वतःच्या कर्तबगारीनें जाऊं शकतो. उदाहरणार्थ, सध्यांच्या ब्रिटिश सरकारच्या मुख्य प्रधानपदावर आरूढ असलेले जेम्स मॅक्डोनॉल्ड हे एका लहानग्या खेड्यांत लहानपणी मासे मारणाऱ्या कोळ्याच्या घरीं जन्मास आले आहेत. आज त्यांच्या हुकमतीपुढें

चंद्रसूर्यवंशोत्पन्न हिंदुस्थानांतले बलाढ्य राजेरजवाडे आणि महान् महान् शास्त्रीपंडित आपल्या माना तुकवीत आहेत.

ही जी पाश्चात्यांची प्रचलित प्रगति तिला मूळ आधार आमच्या जुन्या संस्कृतींत आहे.

ज्या वेळीं हीं पाश्चात्य राष्ट्रें निवळ रानटी स्थितींत होतीं, अंगाला रंग लावून ते लोक नागवे फिरत असत, त्या वेळीं वर्णाश्रमधर्माचा योग्य उपयोग व शिस्त आपल्या देशांत होती, जिची पूर्णावस्था आपल्या ग्रामपंचायतींत शेंकडों वर्षें प्रत्यक्ष दिसून आली आहे. प्रचलित पाश्चात्य दिशाभूल करणाऱ्या केवळ कारकुनोपयोगी शिक्षणामुळें आणि तदनुसार व्यवस्थेमुळें जरी ही ग्रामपंचायतीची घडी सध्यां अत्यंत विस्कळीत झाली आहे तरी पण तिला आपल्या सर्वांच्या अंतर्गत असलेल्या हजारों वर्षांच्या आनुवंशिक शिकवणींच्या आधारानें आज नाहीं उद्यां आपण सुव्यवस्थेप्रत आणूंच आणूं.

या आनुवंशिक गुप्त शिकवणुकीचें एक लहानसें उदाहरण घेऊं या. लेखकाच्या मित्राच्या कारखान्यांत एक ब्राह्मणेतर जातीचे सद्गृहस्थ आहेत. त्यांचें पिढीजात काम जहाजें बांधण्याचें होतें. त्यांचे सासरे घरें बांधण्याच्या कामावर मिस्त्री होते.

या गृहस्थांचें वय सध्यां सुमारें ५० वर्षांचें असावें. सन १९१३ सालीं त्या कारखान्यांत एक ५०० हार्स पॉवरचें डीझल इन्जिन मागविलें होतें. खनिज वासलेट ( ज्याला क्रुड आईल म्हणतात. ) या पदार्थाच्या उपयोगानें चालणारें हें इन्जिन हिंदुस्थानांत प्रथमतःच आणण्यांत आलें होतें. त्याच्या उभारणीसाठीं लेफ्टनंट काली आर्. एन्. ( म्हणजे सरकारी आरमारखात्यांतले अमलदार ) यांस यंत्र बनविणाऱ्या कारखानदारांनीं येथें मोठ्या खर्चानें विलायतेहून पाठविलेलें होतें. मि. कालीनें माझ्या मित्राजवळ एका हजार फीटरची मागणी केली. वरील वर्णन केलेले गृहस्थ त्या वेळीं पॅटर्नमेकर या कामावर रुपये ६० च्या पगारावर होते. पॅटर्नमेकर म्हणजे एखाद्या यंत्राचा

लहानमोठा भाग सुटला असतां त्याच आकाराचा लाकडाचा भाग बनविणारा हुषार सुतार.

मि. काली यांनीं मागणी केल्यावरोबर त्या गृहस्थांची शिफारस मित्रानें केली. मि. काली त्यांना पाहून फारच साशंक झाले. कारण त्यांची शरीरयष्टी फारच ठेंगणी व किरकोळ अशी आहे. तसेंच त्यांना त्यावेळीं धड मराठी सुद्धां वाचतां येत नव्हतें मग इंग्रजी कोठून येणार ? मि. काली हे नव्यानेंच हिंदुस्थानांत आल्यामुळें आपले विचार त्यांना कसे कळविणार ! असा पेंच मि. काली यांना साहजिक पडला आणि त्याप्रमाणें त्यांनीं मित्राजवळ बोलूनही दाखविलें. मित्रानें हांसून मि. काली यांना सांगितलें कीं, आपण एकदां त्यांना त्या यंत्राच्या फाऊन्डेशनचा ( पायाच्या उभारणीचा ) नकाशा द्या आणि त्याप्रमाणें दोऱ्या बांधण्याला सांगा आणि नंतर कसें काय होतें तें पाहा ?

या इन्जिनच्या पायाचें काम फारच बिकट आहे. आणि त्यामुळें मि. काली यांना स्वाभाविक घमेंड होती कीं, युरोपियनाशिवाय इतरांना हें काम होणें अशक्य.

जरी माझ्या मित्रावर मि. काली यांचा पूर्ण विश्वास होता तरी जरा तोंड आंबट करून नकाशाप्रमाणें दोऱ्या वगैरे बांधून तयार करण्यास त्यांनीं सदरील गृहस्थांना सांगितलें. त्यांनीं फार हुषारीनें व तीन तीनदां मापणी तपासून दोन दिवसांच्या आंत दोऱ्या बांधल्या हें पाहून मि. काली अत्यंत आश्चर्यचकित झाले. पाया पूर्ण झाल्यावर त्या यंत्राची उभारणी सुरू झाली. त्या गृहस्थांना डीझल इन्जिन हें काय असतें व कसें चालतें याची ( Theory & Practice ) म्हणजे सिद्धांत आणि चलन हीं स्वप्नांत देखील माहीत नव्हतीं. परंतु त्यांच्या स्वतःच्या आनुवंशिक गुप्त नैसर्गिक बुद्धीमुळें कोणता भाग कोठें कसा बसवावयाचा, आणि पुढें त्याला कशी आणि कोणत्या प्रकारानें गति देतां येईल हें जेव्हां मि. काली यांच्या निदर्शनास त्यांनीं आणून दिलें तेव्हां मि. काली यांच्या आश्चर्याला सीमा राहिली

नाहीं. हें सर्व होईपर्यंत उभयतांचें संभाषण खुणांनीं होत असे. क्वचित् प्रसंग पडल्यास मित्र दुभाष्याचें काम करीत असे.

त्या वेळीं त्या गृहस्थांची बढती होऊन रु. १५० चा पगार करण्यांत आला हें पाहून मि. काली यांना अत्यंत राग आला. ते म्हणाले, जर लग्न झालें नसतें तर त्यांनीं ( मि. कालीनें ) त्या गृहस्थाला kidnap ( जबरदस्तीनें पळवून ) करून विलायतेंत त्याला दरमहिन्याला १५० पौंड म्हणजे लगबग रु. २००० पगार सहज देवविला असता.

आजमितीस या गृहस्थांच्या हाताखालीं त्यांनीं स्वतः उभारलेलीं तीन डीझल इन्जिन्स आहेत. ५००,७५० आणि १०५० हार्सपॉवरचीं आणि तीं बिनबोभाट चालत आहेत. हीं यंत्रें उत्तम स्थितींत ठेवणें फार अकलेचें आणि मेहनतीचें काम आहे. इतर पुष्कळ ठिकाणी हयगयीमुळें मोठमोठ्या पगाराच्या इंग्रज इंजीनिअरांच्या हाताखालीं अशा प्रकारचीं इंजिनें रद्द झालेलीं मुंबईत एक प्रसिद्ध गोष्ट आहे. सध्यां या गृहस्थांचा पगार रु. ४५० आहे.

असो; सारांश सांगावयाची गोष्ट ही कीं, याप्रमाणें पिढीजाद चालत असलेल्या आपल्या अंतर्गत गुप्त शिकवणीचे हे गृहस्थ एक उदाहरण आहेत. ही शिकवण आपणां प्रत्येकांमध्यें प्रच्छन्न रूपानें पूर्णपणें विचरत आहे. तिचा विकास होण्याची खोटी. योग्य साधन आणि योग्य संधी मिळाल्यावर यांत्रिक आणि इतर बाबतींत आपल्या हजारों वर्षांच्या संस्कृतींच्या प्रच्छन्न आधारानें आपण पाश्चात्यांच्या सर्व उद्योगांत व प्रयत्नांत त्यांच्यापुढें जाऊन त्यांना सहज मागें टाकूं यांत मुळींच शंका नाहीं. आत्मविश्वास मात्र पाहिजे.

हा आत्मविश्वास प्राप्तकरून घेण्याचा आपण सर्वांनीं रात्रंदिवस सारखा ह्व्यास ठेविला पाहिजे. **अभी**युक्त अंतःकरणानें परमेश्वरावर आणि संत वचनांवर पूर्ण विश्वास ठेवून **सत्याला** चिकटून राहिलें पाहिजे. **सत्या** प्रीत्यर्थ देह पडो, तरी त्याची परवा नाहीं असें आपलें वर्तन पाहिजे. म्हणजे प्रत्येकाला योग्य तो मार्ग दिसून सर्व जनता सारख्या भावनेनें प्रेरित होऊन

खडबडून जागी होईल. उपनिषदांच्या आधारानें योग्य तींच वळणें व रूढि मार्गदर्शक संत व महात्मे दाखवीत आले आहेत व दाखवीत राहातील. श्रीसांईमहाराजांसारख्या दिव्य ज्योति आणि प्रचलित गांधीमहाराजांसारखे महात्मे श्री नारद भक्तिसूत्रांत वर्णन केल्याप्रमाणें " तीर्थी कुर्वन्ति तीर्थानि, सुकर्मी कुर्वन्ति कर्माणि, सच्छास्त्री कुर्वन्ति शास्त्राणि ' याप्रमाणें आधारभूत व मार्गदर्शक होऊन आपण आपणा सर्वांच्या हृदयांत पूर्णपणें वसलेल्या हजारो वर्षांच्या सुषुप्त अनुभवांनीं पूर्ण स्फूर्तियुक्त होऊन आपल्या या परमपूज्य, अतिपवित्र व प्रिय अशा भारतमातेला पुनरपि ऊर्जित अवस्थेला आणून स जगताला सर्वप्रकारें आदर्शभूत करूं यांत तिळमात्र संदेह नाहीं.

सर्व भक्तांचा चरणरज.

" म्हातारा "

खरीकरितसेकशीतवजनींहिसत्तापहा ।
इचावधननिंद्यबाप्रबळमूर्तसत्तापहा ॥
कथासुरभिचारसस्वहितपुष्कळस्वादुही ।
म्हणेत्यजुनिकींमलानिजधनापरस्वादुही ॥ ५७ ॥

मागील केकेंत-विषयवासनारूप खरीचा वध करण्याविषयीं प्रार्थना केली, त्याचें आणखी कारण येथें दर्शवित होत्साते कवि म्हणतात.

पदान्वयः—तव जनीं हि खरी कशी सत्ता करितसे पहा, बा इचा वध निंद्य न, हा प्रबळ मूर्त सत्ताप, कथासुरभिचा रस स्वहित पुष्कळ स्वादु ही म्हणे परस्वा त्यजुनि मला निजधना दुही कीं.

सज्जनांस विषयवासनेची गांजणूक किती आहे हें येथें कवि वर्णितात:—तव जनीं हि खरी कशी सत्ता करितसे पहा,-तव जनीं-तुझ्या जनांमध्यें-अर्थात् तुझ्या भक्तमंडळांत हि खरी-ही विषयवासनारूप पूर्वोक्त गाढवी, कशी सत्ता करितसे-कशा प्रकारें आपली-सत्ता-प्रभुत्व-अर्थात् प्रजापीडनरूप अधिकार करितसे-चालवीत आहे तें-पहा-तूं अवलोकन कर-अर्थात् त्याचा विचार कर. अथवा, हि हें अव्यय करून साधुजनांतहि म्हणजे दुष्ट पापी जनांमध्यें तर ही गाढवी सत्ता करिते यांत आश्चर्य नाहीं, परंतु तुझ्या भक्तजनांतहि सत्ता करिते, असा अर्थ करावा. तुझ्या भक्तांस इची पीडा फार आहे म्हणून-बा इचा वध निंद्य न,-बा-हे बापा इचा-या गाढवीचा वध-हनन निंद्य न-निंद्य नाहीं-अर्थात् स्तुत्य होय; कारण-हा प्रबळ मूर्त सत्ताप,—हा-गर्दभीरूप केवळ-प्रबळ-अत्यंत बलिष्ठ असा मूर्त-मूर्तिमान सत्ताप,-सत्-साधुजन त्यांस-ताप-पीडनरूप संताप होय; अर्थात् साधुजनांस ही मूर्तिमान अशी मोठी पीडा होय; कशी म्हणाल तर पाहा-कथासुरभिचा रस स्वहित पुष्कळ स्वादु ही म्हणे परस्वा त्यजुनि मला निजधना दुही कीं,-कथासुरभिचा रस स्वहित पुष्कळ स्वादु,-कथासुरभिचा,-कथा-अर्थात् भगवद्गुणकीर्तन हीच कोणी-सुरभि-कामधेनु इचा, रस-गोरस-अर्थात् दूध स्वहित-आपल्यास हितकारक[1] आणि-पुष्कळ स्वादु-अति मिष्ट असतां-ही म्हणे,-ही गाढवी साधुजनांस म्हणते, कीं-परस्वा त्यजुनि मला निजधना दुही कीं,-परस्वा त्यजुनि,-परस्वा-परस्व-परकीय

१ हित, पाप, इत्यादि कित्येक शब्द शुद्ध नामें असून-हितकारक, पापी, अशीं तत्तद्भावविशिष्ट विशेषणेंहि होतात;—

आपद्युन्मार्गगमने कार्यकालात्ययेषु च
कल्याणवचनं ब्रूयादपृष्टोऽपि हितो नरः

—पञ्चतन्त्र

वस्तु–अर्थात् तें परकीय दूध त्यातें, त्यजुनि–टाकून मला निजधना दुही कीं,– मी जी निजधन–तुझें धन–तुझी स्वसत्तात्मक वस्तु, त्या मलाच दुही कीं,[1]–दोह कीं–माझेंच दूध काढ कीं;[2] अर्थात् कथासुरभीचें दूध कशास घेतोस ती परकीय वस्तु, मी तुझीच माझें दूध काढ कीं, असें तुझ्या भक्तास ही वारंवार म्हणत असते, अशी हिची गांजणूक आहे; असा अर्थ.

अथवा, कोठें–‘ **म्हणेत्यजुनिकांमलानिजधनापरस्वादुही** ’ असा पाठ असतां, मला निजधना त्यजुनि–मी जें तुझें निजधन–तुझी स्वसत्तात्मक वस्तु त्या मला टाकून, **परस्वा कां दुही,**—परस्वा–परकीय वस्तु जी कथासुरभि तीतें कां दुही–कशा-करितां दोहतोस–अर्थात् तिला दोहूं नको मलाच दोह, असा पदान्वय करून अर्थ करावा. परंतु, येथें ‘ **कां दुही** ’ हें वाक्य ग्रंथभाषेच्या व्याकरणास अनुसरून आहे असें मला वाटत नाहीं. ‘ दुही ’ हें आज्ञार्थी रूप होय, स्वार्थी वर्तमानकाळीं द्वितीय पुरुषाच्या एक-वचनाचें रूप असें बहुधा आढळत नाहीं. म्हणून मला वाटतें कीं हाच पाठ शुद्ध होय.

---

१ दुही हें दुहणे या धातूचें ग्रंथभाषेंत आज्ञार्थी द्वितीय पुरुषाचें एकवचनाचें रूप होय.

२ कीं हें येथें अवधारणार्थी अव्यय जाणावें. पंढरपूर, सोलापूर, या प्रांतीं–‘तूं, जा कीं,’ ‘तुम्हीं बोला कीं,’ ‘इतकें काम करा कीं,’ म्हणजे जाच, बोलाच, कराच, अथवा जा तर खरा, बोला तर खरे, करा तर खरे, अशी बोलण्याची रूढि फार आहे.

कथासुरभियाभल्यास्वजननीहुनीवाटती।
शिशूंसजरठांसहीनिरखितांरसेंदाटती॥
दुहोतभलतेसदातरिनलेशहीआटती।
स्ववत्समलभक्षितीपरिनसर्वथावाटती॥ ५८॥

मागील दोन केकांत भगत्कथांस कामधेनूची उपमा कवीनें दिली, परंतु ती गौण, असा आपला अभिप्राय कथित होत्साते या व पुढल्या केकेंत कवि त्याच भगत्कथेचा स्तव करितात.

पदान्वयः—या कथासुरभि स्वजननीहुनी भल्या वाटती, शिशूंस जरठांस ही निरखितां रसें दाटती, भलते सदा दुहोत तरि लेश ही न आटती, स्ववत्समल भक्षिती परि सर्वथा न वाटती.

या कथासुरभि स्वजननीहुनी भल्या वाटती,—या कथासुरभि–या तुझ्या कथासुरभि–गुणकथारूप कामधेनु, स्वजननीहुनी–आपल्या आईपेक्षां मला भल्या वाटती, भल्या–अधिक स्नेहाळ वाटती–वाटतात–दिसतात; याचें कारण, या तुझ्या कथाकामधेनु शिशूंस जरठांस ही निरखितां रसें दाटती,—शिशूंस–बाळांस जरठांस ही–वृद्धांसहि निरखितां–निरखून–स्नेहार्द्रदृष्टीनें अवलोकून रसें–दुग्धेंकरून–पक्षांतरीं स्नेहार्द्रतेनें दाटती–दाटतात–परिपूर्ण भरतात; आया लहान बाळकांस मात्र पाहून अथवा त्यांस स्तनास लावून मग पान्हावतात; परंतु या तुझ्यां कथाकामधेनु तर म्हाताऱ्यांसहि पाहिल्यानें पान्हावतात; तेव्हां या आईपेक्षांहि अधिक स्नेहाळ म्हटल्या पाहिजेत; आणखी भलते सदा दुहोत तरि लेशही न आटती,—भलते–कोणीहि सदा–निरंतर दुहोत–या कथाकामधेनूला दोहोत, उपमेयार्थी, दुहोत–म्हणजे भगवद्भक्त भगवद्गुणकथनमननानें अंत:करणशुद्ध्यादि इष्टफलावाप्ति त्या कथांपासून करून घेवोत, तरि–तथापि लेशही–एक लेशभरहि न आटती–आटत नाहींत; उपमेयार्थी, इष्टफलप्रदानाविषयीं असमर्थ होत नाहींत; इतर धेनु भलत्यास दोहूं देत नाहींत, आणि एकदां दोहल्या असतां त्यांचें दूध सरतें, कथाधेनु सर्वांस दोहूं देतात, आणि आटतहि नाहींत; आणखी स्ववत्समल भक्षिती परि सर्वथा न वाटती,—स्ववत्समल–आपल्या वत्साचा–वासराचा मल–शरीरावरील मळ अथवा मूत्रादि अंतर्मळ उपमेयार्थी स्ववत्समल–म्हणजे शरणागतस्वभक्तकृतपाप त्या धेनु भक्षिती–भक्षितात–चाटून खातात उपमेयार्थी, तें पाप दूर करितात परि–परंतु–तथापि

सर्वथा-कधींहि-अगदीं न वाटती-वाटत नाहींत-मलभक्षणानें अपवित्र होत नाहींत-त्यांच्या दोषानें आपण दोषी होत नाहींत. येथें भगवद्गुणकथा जें उपमेय त्याचें कामधेनु जें उपमान त्यापेक्षां वृद्धांस पाहून पान्हावणें, भलत्यानें दोहल्या असतां आणि निरंतर दोहल्या असतांहि न आटणें, स्ववत्समलभक्षणानेंहि अपवित्र न होणें, या धर्मकथनानें आधिक्य वर्णिलें आहे, म्हणून हा व्यतिरेक अलंकार जाणावा.

कथांशिउपमादिल्हीसुरभिचीदिसेनीटती।
परंतुबहुमंदमीह्मणुनिसच्छुतीवीटती॥
कथानिरुपमातयांप्रतिपशूपमाशुद्धतें।
नव्हेचिनविचारिलेंबुधजनांशिम्यांउद्धतें॥ ५९॥

भगवत्कथांस कामधेनूच्या उपमेचें गौणत्व प्रकारांतरेंकरून कथित होत्साते कवि म्हणतात.

पदान्वयः—कथांशि सुरभिची उपमा दिल्ही ती नीट दिसे, परंतु मी बहु मंद म्हणुनि सच्छुती वीटती; कथा निरुपमा, तयां प्रति पशूपमा तें शुद्ध नव्हेचि, म्यां उद्धतें बुधजनांशि न विचारिलें.

कथांशि सुरभिची उपमा दिल्ही ती नीट दिसे,—कथांशि—भगवद्गुणकथांस सुरभिची—कामधेनूची उपमा दिल्ही ती योग्य दिसती खरी—कित्येकांस ती उपमा बाह्यात्कारीं नीट दिसेल खरी; परंतु मी बहु मंद म्हणुनि सच्छुती वीटती,—परंतु मीं फारच मंदबुद्धि म्हणून सच्छुती वीटती,—सच्छुती,—सत्—साधु—तत्त्वज्ञानी त्यांच्या—श्रुती[1]—कान, अथवा, सत्—चांगल्या—तत्त्वज्ञानेंकरून सूक्ष्म झालेल्या अशा श्रुती—कान वीटती—विटतात; अर्थात् तत्त्वज्ञानी पुरुषांचे कान या अशा अप्रशस्त—वेडयावांकडया उपमेनें विटून जातात; तत्त्वज्ञानेंकरून त्यांचें श्रवणज्ञान अतिसूक्ष्म झालेलें असतें म्हणून तत्काल अशा उपमेचें अप्राशस्त्य त्यांस समजतें, आणि त्यांच्या कानास त्या कर्कश लागतात; अर्थात् ज्यांस सच्छुती नाहींत, जे केवळ शाब्दिक म्हणजे शब्दार्थवेत्ते त्यांस अशा उपमा नीट दिसतात; परंतु ज्यांस सच्छुती आहेत त्यांस अशा उपमा प्रशस्त दिसत नाहींत. सच्छुती काय म्हणून विटतात तें सांगतात—कथा निरुपमा,—भगवद्गुणकथा केवळ—निरुपमा—अनुपमेय—उपमेस योग्य नाहींत—अर्थात् स्वतः भगवान् निरुपम तेव्हां त्याचे गुणहि निरुपम, मग—तयां प्रति पशूपमा तें शुद्ध नव्हेचि,—तयां प्रति—अशा निरुपम ज्या कथा त्यांस पशूपमा,—पशु—अर्थात् कामधेनु—यद्यपि स्वर्गस्थांचे मनोरथ पूर्ण करणारी झाली तथापि धेनुत्वेंकरून ती पशूच तिची उपमा देणें—तें शुद्ध नव्हेचि,—तें प्रशस्त नाहींच नाहीं; असें असतां—म्यां उद्धतें बुधजनांशि न विचारिलें,—म्यां उद्धतें—स्वबुद्धीच्या अभिमानानें उद्धत झालेला जो मी त्या म्यां बुधजनांशि—ज्ञानी जनांस—तत्त्ववेत्तेजनांस न विचारिलें—

१ येथें श्रुति शब्द ऱ्हस्वइकारांत असतां दीर्घईकारांत कवींनीं केला आहे तो द्विवचनान्त आहे हें जाणविण्याकरितां; असें समजावें.

विचारिलें नाहीं—अशी भगवद्गुणकथांस कामधेनूची उपमा द्यावी किंवा नाहीं याविषयीं त्यांचें अनुमत प्रथम घेतलें नाहीं असा अर्थ; [1] अर्थात् त्यांचें अनुमत घेतलें असतें तर ते अशी कामधेनूची उपमा द्यावयास न सांगते; अशी येथें कवीनीं आपली विनयता इंगित केली आहे.

---

१ भगवत्कथा अतिसरस म्हणून भागवतांत गोपींनीं आपल्या गीतांत वर्णिलें आहे.—

तवकथाऽमृतंतप्तजीवनं । कविभिरीडितंकल्मषापहं ।
श्रवणमंगलंश्रीमदाततं । भुविगृणंतितेभूरिदाजनाः ॥ ९ ॥

—भा० द० स्कं० अ० ३१.

असेंहिउपदेशितीगुरुरहस्यमंदारुचे।
निजस्तवजसातसाअगुणघेनवंदारुचे ॥
म्हणोनिनिगमस्तुताभलतसेंतुळावानितों।
परंतुहृदयींमहाजनभयासमींमानितों ॥ ६० ॥

मागील दोन केकांत कामधेनूच्या उपमेचें न्यूनत्व दर्शविलें खरें, परंतु तेणेंकरून आपल्या स्तवनास न्यूनत्व येत नाहीं, तें निरंतर स्वीकारास योग्यच आहे, असा आपला अभिप्राय कथित होतसाते कवि या केकेंत म्हणतात.

पदान्वयः—निजस्तव जसातसा रुचे, वंदारुचे अगुण नघे, असेंहि गुरु रहस्यमंदा उपदेशिती; म्हणोनि निगमस्तुता भलतसें तुला वानितों, परंतु मीं हृदयीं महाजनभयास मानितों.

निजस्तव जसातसा रुचे,—भगवंतास-निजस्तव-आपला स्तव-स्तुति, जसातसा-जसा कोणी करील तसा—जसा कोणी आपल्या बुद्धीच्या शक्तीप्रमाणें करील तसा रुचे—रुचतो—आवडतो; आणि-वंदारुचे[1] अगुण[2] नघे,-वंदारुचे-वंदन करणाराचे-अर्थात् स्तुतिपाठकाचे—अनन्यभावेंकरून शरण जाऊन जो कोणी यथामति भगवंताचें स्तवन करितो त्याचे अगुण-दुर्गुण नघे-घेत नाहीं; अर्थात् अशा स्तावकाचा दोष न पाहातां त्यानें यथामति अर्पिला जो स्तव तो भगवान् गोड मानून घेतो; असें हि गुरु रहस्यमंदा उपदेशिती, असें हि-वरल्या केकेंत मीं आपलें बुद्धिमांद्य प्रकट केलें तथापि वर सांगितल्याप्रमाणें भगवंतास आपला स्तव कोणी यथामति जसातसा केला तरी रुचतो, आणि तो वंदन करणाराचा दोष घेत नाहीं, असेंहि गुरु-ज्ञानी पुरुष-सत्ज्ञानोपदेशक रहस्यमंदा,-रहस्य-तत्त्वज्ञान-भगवद्भक्तीचें यथार्थ ज्ञान त्याविषयीं जो-मंद-अज्ञ-अचतुर त्याला,उपदेशिती-सांगतात; अथवा, येथें 'रहस्यमंदा' हा एक सामासिक शब्द न करितां, असें हि रहस्य गुरु मंदा उपदेशिती,-हें वर सांगितलें जें 'वंदारुचे अगुण नघे' म्हणून

१ हा शब्द मुळीं 'वद-अभिवाद स्तुत्योः' या धातूवरून कर्त्रर्थी आरु प्रत्यय होऊन झाला आहे.

लज्जाशीलेऽत्रपिष्णुर्वंदारुरभिवादके—

—अमर.

२ अगुण म्हणजे अवगुण, दोष असा येथें अर्थ. नञ्शब्दप्रकरणामध्यें अ अ० अन् हा आगम अन्यत्व, सादृश्य, विरोध अप्राशस्त्य, इतक्या अर्थांचा बोधक होतो म्हणून सांगितलें आहे. येथें गुणाच्या विरुद्ध जो दुर्गुण त्याचा बोधक जाणावा.

—अमर.

# पाश्चात्यांची दिखाऊ सुधारणा.

" बाबा ! मला जात्याला हात लाऊं द्या ना ! "

" आये ! तूं थकशील ! "

" बाबा ! मला होईल तितकें मी आनंदानें दळीन. "

" बरें आये " असें म्हणून जात्यावर बसलेल्या लक्ष्मीबाईला बाजूस व्हावयास सांगून, ते, जमालबाई आणि मित्राची बायको, हीं दळावयास लागलीं.

सन १९१६ च्या मे महिन्यांतली ही गोष्ट आहे. श्री साईबाबांच्या मशिदींतलें हें जातें पुष्कळांनीं पाहिलें आहे, आणि बाबांना इतरांबरोबर गहूं दळतांनाही पाहिलें आहे, आणि त्यांना त्याविषयीं अत्यंत कौतुक वाटलें.

आतां ही मशीद म्हणावी तर तेथें धुणी कसली व दळण कसलें ? हा प्रश्न कोणी अधिकारी पुरुषानें सोडवावा.

लेखकानें पहिल्या दर्शनापासूनच याविषयीं विचार करण्याचें सोडून दिलें आहे. श्री साईबाबांच्या सान्निध्यामुळें आणि त्यांच्या शिकवणी व आशीर्वादामुळें याविषयीं विचार करून वृथा शब्दच्छल करण्याचें त्याला प्रयोजन व कारण दिसलें नाहीं व सध्यांही दिसत नाहीं.

असो. पुढील संवाद मजेचा झाला. मित्राची बायको म्हणाली "बाबा ! हे गहूं तुम्ही कां दळतां ? "

" आये ! कधीं कधीं त्याच्या पिठाच्या भाकरी करून बाळगोपाळांना खाऊं घालवेसें वाटतें म्हणून ? "

" पण बाबा ! कधीं कधीं तें पीठ शिवेच्या ओढ्यावर नेऊन टाकवितां तें कां ? "

" आये ! कधीं कधीं त्या आकाबाईचा फेरा येथें येत असतो. ती त्या ओढ्यावर बसून माझा लई काळावाला करते कीं, मला गांवांत येऊं दे; तेव्हां मला तिला खाऊं घालावं लागतं ना ! "

" बाबा ! ही जरीमरी दैवतं आहेत का ? "

" होय आये ! हीं हल्कीं दैवतं आहेत, पण तीं आपल्याला कांही बी करणार नाहींत. "

" मग जरीमरी गांवांत येऊन कांहीं माणसं वाऱ्यानं मरतात तें कसं ? "

" आये ! ती मला लई शिया देती. तेव्हां मी देवाला पुसतुं, आणि त्याचा हुकूम घेऊन मोजकीं माणसं तिला नेण्याला सांगतों. "

" तर बाबा ! भुतंखेतं आहेत खरीं ! "

" होय आये ! आहेत तर. पण तीं आपल्या वाटेस जायचीं नाहींत ! "

" बाबा ! आम्ही नायगांवला राहात होतों तेथें एक पुरुष रोज तिन-सांजचा विहिरीच्या बाजूकडून येऊन पायऱ्या चढून एका खोलींत जात असे आणि तेथेंच नाहींसा होत असे ! "

" आये ! त्याला मी ओळखितों. तो त्या घरचा मालिक होता. आणि ज्या खोलींत तूं बाळंत झालीस त्याच खोलींत तो नाहींसा होत होता ना ? "

बाई विस्मित मुद्रेनें म्हणाली " बाबा ! तुम्हाला काय माहीत ? "

" आये ! तूं ल्हान होतीस तंवांपासून मी तुला ओळखितों ! मध्यें तूं मला विसरली होतीस. मग तुला इकडं बुलावून आणली. अग ! माझे बाळगोपाळ जरी हजारों कोसांवर असले, तरी मी त्यांना जवळ बोलावून आणीत असतूं. माझी नजर सगळ्यांवर सारखी आहे आये ! खटनट, सुष्ट-दुष्ट, सगळ्या तऱ्हेचीं माणसं आपल्या दरबारांत येतात. त्या सगळ्यांवर मला सारखी नजर ठेवावी लागते ना ? "

इतकें संभाषण होत आहे तों मित्राची बायको थकली हें जाणून बाबा म्हणाले " आये, तूं आतां दमलीस, आतां या बाईला जाण्याला हात

खवूं दे " तेव्हां ती दूर झाली आणि बाबा, जमालबाई आणि लक्ष्मीबाई असे तिघेजण भरभर जातें चालवून तें गहूं हां हां म्हणतां घंटाभरानें दळले. दळण झाल्यावर तें पीठ चाळून पाखडून त्याची मळणी होऊन बाबा स्वतः भाकऱ्या लाटावयास बसले. बाबा किती तरी मोठ्या आकाराच्या भाकरी स्वतः लाटीत आणि भाजीत असत हें आम्ही सर्व कौतुकानें पाहात होता.

आतां भुतेंखेतें वगैरेंच्या अस्तित्वाविषयीं दुसऱ्या एखाद्या लेखांत विचार होईल. येथें इतकें मात्र नमूद करतों कीं, कित्येकांप्रमाणें माझ्या मित्राच्या बायकोलाही दृष्टि होती. आम्ही बहुधा याविषयीं डोळ्यांचा विकार असावा अशा साशंक वृत्तीनें विचार करीत असूं; पण बाबांनीं त्याविषयीं स्पष्ट बोलून बाईच्या अनुभवाच्या सत्यतेविषयीं आमची खात्री करून आमचें समाधान केलें.

आणखी दुसरीही गोष्ट अत्यंत विचार करण्यासारखी आहे. ती ही कीं, श्रीसांईबाबांचें आश्वासन कीं, "भुतेंखेतें आपल्या वाटेस जावयाचीं नाहींत."

श्री सांईबाबांचा अधिकार विश्वव्यापी होता. झपाटलेलीं माणसें त्यांच्याजवळ येत असत आणि ते त्यांना बरें करीत असत, हें पुष्कळांनीं पाहिलेलें आहे. अशा पूर्ण स्वामित्त्वाच्या अधिकारी पुरुषाला शरण जाऊन त्यांचा वरदहस्त आपल्या माथ्यावर असून अथवा तितकीच आश्चर्यकारक पूर्ण अधिकारयुक्त अशी त्यांची उदी जवळ असल्यावर या क्षुद्र योनींचें कांहींही चालणार नाहीं हें आश्वासन लहानसहान आहे काय?

श्रीकृष्ण परमात्मा श्री गीतेंत तरी-हेंच शिकवीत आले नाहीं काय कीं, जरी मी सर्व दैवतांत आहे तरी त्या क्षुद्र दैवतांना बाजूस ठेवून मला एकट्यालाच त्वां भजावें, शरण जावें, मग तुझी चिंता मलाच सर्वतोपरीनें ठेविलीच पाहिजे.

श्री साईलीलेचें अस्तित्व तरी याचसाठीं नाहीं काय? प्रत्येकाला श्रीभगवान् आपल्यापाशीं आहे, असा आत्मविश्वास अनुभवयुक्त उत्पन्न

होऊन त्याचें जीवित हीनदीन वृत्तिविरहित होऊन त्याच्या हातून धडाडीची कार्ये व्हावींत ही श्रीसाईबाबांच्या लीला अवलोकन करून अथवा अनेक स्त्रीपुरुषांच्या लेखणींतून त्यांचे प्रत्यक्ष अनुभव वाचून ते पचवून अभी युक्त होण्यासाठीं नव्हे काय ?

श्रीसाईबाबांनीं मुख्यत्वेंकरून आपल्या दक्षिणी मंडळीसारख्या चिकित्सक व अश्रद्धाळू जनांना रस्ता दाखविण्यासाठींच शिर्डीस वास्तव्य केलें हें उघड आहे.

श्री माणिक प्रभूप्रमाणें तसेंच श्री अक्कलकोटच्या स्वामी महाराजां-प्रमाणें श्रीसाईबाबांचें अस्तित्व व लीला हिंदु, मुसलमान, पार्शी, खिस्ती या सर्वांना एके ठिकाणीं आणून वृथा गोळंकार न करतां सर्वांचा रस्ता एक आहे ही जाणीव देण्यासाठीं नव्हतें काय ?

असो. वर लिहिलेला दळणकांडणादि प्रकार पाहून स्वाभाविकरीत्या विचार सुचतो कीं, श्रीसाई बाबांसारख्या दिव्य परिपूर्ण पुरुषानें ही गोष्ट कां करावी ! त्यांना या जगांत काय करावयाचें बाकी राहिलें होतें ? कीं त्यांनीं स्वतः गहूं दळून त्याचें पीठ करून तें चाळून पाखडून मळून त्याच्या भाकऱ्या लाटून भाजून त्या बाळगोपाळांना त्यांनीं खाऊ घालाव्या. ?

आतां भुतांखेतांसाठीं पारमार्थिकदृष्ट्या त्यांच्या पुढच्या भाकर तुकड्यांतून ते हमेशा कांहीं घास बाजूला ठेवीत असत. आपणांतही भाविक जन जेवणापूर्वी पांच घास बाजूला ठेवून नंतर चित्रावळ घालून अन्नाला प्रणाम करून नंतर भोजन सुरू करितात. निराकार प्रभूला आळ-विणारे, समोर आलेलें अन्न देवाला अर्पण करून नंतर ते त्याचा प्रसाद म्हणून सेवित नाहीं काय ?

पाश्चात्यांमध्यें गेल्या पंचवीस तीस वर्षांपूर्वी ग्रेस म्हणजे प्रभूचे आभार मानून नंतर अन्न ग्रहण करण्याचा रिवाज होता. मागल्या लेखांत लिहिल्याप्रमाणें आजमितीस देवावरचा त्यांचा विश्वास दिवसें-

दिवस क्षीण होत चाल्यामुळें, हा प्रेस म्हणण्याचा प्रघात नाहींसा होत आहे. आणि आम्ही त्यांचें क्षुद्र अनुकरण करून हॉटेलांत जाऊन खाव-यास शिकल्यामुळें हा प्रघात आपणामध्यें झपाट्यानें शिरत आहे. हें असें व्हावें हें आपल्यासारख्या प्रभुप्रेमी मनुष्यांना इष्ट आहे काय ?

" त्यांत काय आहे ! न केलें तर कोठें नडतें !" असेंही बोलणारे पदोपदीं आढळतात. परंतु जरा विचार करावा. साधें व सुग्रास अन्न आपल्यापुढें देवाच्या दयेनें वाढण्यांत येत आहे. आज किती तरी श्रीनारा-यणाच्या रूपांना दारिद्र्यानें गांजल्यामुळें या आपल्या पुढल्या अन्नाचा किंचितूही भाग त्यांच्या दृष्टीस पडत नाहीं. रात्रंदिवस स्वतःच्या व बापड्या पोराबाळांच्या अर्धपोटीं, कृश व वाळलेल्या शरीरांकडे पाहून त्यांना काय दुःख होत असेल याचा क्षणभर तरी विचार करून, त्यांना अन्न मिळावें अशी प्रार्थना करून एक घांस त्यांच्याप्रीत्यर्थ बाजूस काढून ठेवल्यास सर्वसाक्षी, सर्वव्यापी, सर्वशक्तिमान् अंतर्बाह्य भगवान् या आपल्या इच्छे-नुसार आपणांला तसेंच या दरिद्रीनारायणांना दुःखमुक्त होण्याचा मार्ग दाखवील यांत शंका आहे काय ?

या अर्धपोटीं राहाणाऱ्या दीनदरिद्री नारायणांचें कल्याण कसें होईल याविषयीं कायिक, वाचिक, आणि मानसिक तपश्चर्या वर्षेंच्या वर्षें करून आज महात्मा गांधी यांनीं जनतेंत जें चलन आणि जागृति उत्पन्न केली आहे त्याचा विचार जरूर करावा. त्यासाठीं ते अर्धपोटीं राहिले व वस्त्रहीन झाले. स्वतः उपासतापास करून शरीरास कष्ट देऊन आठवड्यां-तून एक दिवस निखालस मौन राहून शारीरिक, बौद्धिक आणि आत्मिक सामर्थ्य त्यांनीं प्राप्त करून घेतलें कीं, ज्याचा प्रभाव आज आपण आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहात आहोंत.

या गोष्टी आकस्मित घडून येत नाहींत. यांत कांहीं तरी निखालस विशेष गुह्य आहे. ज्यांनीं श्रीसांई बाबांना स्वतः दळून, कांडून, भाकऱ्या

करून त्या गोरगरीबांना व इतरांना खाववितांना पाहिलें आहे त्यांना या गुह्याचा मतितार्थ सहज कळून यावा.

या उपरांत श्रीसाईबाबांच्या दळणकांडणादि क्रियांत दुसराही निष्कर्ष निघतो. तो हा कीं पाश्चात्यांच्या केवळ डोळे दिपविणाऱ्या खोट्या दिखाऊपणाकडे दृष्टि वळवितां कामाची नाहीं हें.

श्री सांईबाबांनीं लो. टिळक, खापर्डे वगैरे त्या वेळच्या सर्व पुढारी, ठळक व प्रसिद्ध अशा विद्वान, शास्त्री, पंडित, डॉक्टर, वैद्य, इन्जीनिअर्स, कलेक्टर, मामलेदार, सरदार, जहागिरदार, राजे, राण्या, यांना आपल्या पायापाशीं आणून कृतकृत्य केलें. आणि या सर्वांना, संसारी स्त्रीपुरुषांना उचित अशी अत्यंत साधी राहणी कशी असावी, याचें प्रत्यक्ष वर्तन करून दाखविलें याचें काय कारण असावें बरें ?

पाश्चात्यांच्या संसर्गामुळें आपण साध्या राहणीपासून दूर होत चाललों आहोंत, आणि त्यामुळें आपण आपल्या नैसर्गिक उपयुक्त कलांना फारकत देऊन कृत्रिम राहणी अंगीकृत करीत आहोंत. जी कृत्रिम राहणी आपणाला जरूर तोंडघशीं पाडील.

शहरांतून राहाणाऱ्या कितीतरी कुटुंबांना आपल्या उपयुक्त कलांची लाज वाटून पाश्चात्यांप्रमाणें खाणावळींतून डबे मागवून खाण्याची चटक लागली आहे पाहा ! यदाकदाचित् निरुपायामुळें तसें करण्याचा प्रसंग आला तर ती गोष्ट निराळी. परंतु तसें कांहीं कारण नसतां केवळ बेगडी स्वेच्छाचारासाठीं, 'वेळ नाहीं,' ही सबब पुढें करून खाणावळींतल्या अन्नावर भागवीत असतात !

अन्नच तें, तें बिचारें आपलें काम करितें. पण घरचें प्रेमपूर्वक तयार झालेलें अन्न आणि बाजारी अन्न, यांत जमीनअस्मानाचा फरक आहे हें कोणीही सुज्ञ गृहस्थ व गृहिणी कबूल करतील.

घरांत लहान मूल आहे, आणि त्याला बाटलींतून वर दूध देणें भाग पडलें आहे, तर त्या मुलाची माता दुधाची बाटली व तिचीं रबरी बोंडें किती तरी काळजीनें साफ करून, दूध योग्य रीतीनें गरम करून नंतर बाळास पाजीत असते! तीच जर निष्काळजीपणानें वेळ नाहीं ही सबब पुढें करून, हें काम मोलकरणीवर सुप्रत करील, तर त्याचा परिणाम त्या बालकाच्या प्रकृतीवर होऊन, अमांशासारखे रोग जडून त्या बालकाचे हाल, डॉक्टरचीं बिलें, जागरणें, आणि त्यापासून सर्वांच्या प्रकृतीना अस्वस्थता, आणि पुष्कळ वेळां तें बालक अकालीं मृत्युमुखीं पडणें, हे प्रकार आपण नित्यशः पाहात नाहीं काय?

त्याचप्रमाणें दुकानांतलें अन्न केवळ नफा मिळविण्याच्या हेतूनें बनविलेलें असल्यामुळें त्याच्या शुद्धाशुद्धतेविषयीं दुकानदार बहुशः बेफिकीर असतो. विशिष्ट तऱ्हेचे मसाले घालून त्या अन्नांतले दोष कळूं नयेत या हेतूनें तें खपविण्याचा तो यत्न करीत असतो. असें कृत्रिम अन्न बाधल्याशिवाय राहील काय? कृत्रिम रीतीनें गोठविलेलें डब्यांतलें दूध, बिस्किटें, मासे, वगैरे पदार्थ सेवन करून Toxine Poisoning प्राणघातक झालेले आपण पाहात नाहीं काय? चॉकोलेटच्या वडया मोठ्या हौसेनें मुलांना देण्याचा व स्वतः खाण्याचा प्रघात अलीकडे बळावला नाहीं काय? पण चॉकोलेटची वडी फोडून त्यांत असलेल्या सूक्ष्म जंतूंकडे आणि या जंतूंच्या विष्टेकडे कोण पाहातो? बाह्य भपक्याला भुलून जुनाट असलेली घाणेरडी Toffee म्हणजे चिक्की अवाढव्य किंमतीला आपण खरीद करीत असतों. जी वस्तु घरीं थोडया वेळांत दोन पैशांत सहज आणि उत्तम होऊं शकते!

कुल्पी मलई ही वस्तु शहरांतून घरोघरीं रात्रीच्या वेळीं खरीद करण्याची जणूं काय एक जन्मसिद्ध गोष्ट झाली आहे. पण ही वस्तु किती घाणेरडया जागीं बनविण्यांत येत असते हें कोणी पाहिलें आहे काय?

सारांश, अशा तऱ्हेचें दूषित बाजारी अन्न खाण्यांत आल्यामुळें जंत, अपचन, अमांश, आणि टायफॉइड या रोगांना शहरांतून कायमचें स्थान मिळालें आहे, आणि त्यामुळें दिवसेंदिवस शहरांतून राहाणाऱ्या स्त्रीपुरुषांचीं शरीरें रोगग्रस्त आणि निःसत्व होत चाललीं आहेत. पचनक्रिया क्षीण झाल्यामुळें तिला ऊर्जित करण्यासाठीं ब्रँडी, व्हिस्की वगैरे भयंकर मदिरा-रूपी जहरांचें सेवन करण्यांत येतें, आणि त्यांचा एकदां शरीरावर व मनावर कायमचा ताबा बसल्यामुळें, कितीतरी होतकरू तरुण संसारांत पडतात न पडतात तोंच अकालीं कालवश झाल्याचें आपण प्रत्यक्ष पाहात आहोंत.

पाश्चात्यांनीं आतां ( vitamins ) व्हिटामिन या द्रव्याचा शोध लाविला आहे. हीं व्हिटामिन्स ४।५ तऱ्हेचीं आहेत. आणि तीं शरीर-संगोपनासाठीं अत्यंत जरूरीचीं आहेत, असें ते खात्रीपूर्वक सांगत आहेत.

ह्या व्हिटामिन्समधलें मुख्य व्हिटामिन, दाण्याच्या ज्या टोकांत त्याचें जीवन सांठविलेलें असतें, म्हणजे दाणा जमिनींत लावला असतां जेथून त्याचें मूळ जमिनींत जाऊन त्याचें झाड उत्पन्न होत असतें त्या टोकांत हें व्हिटामिन अत्यंत सूक्ष्म रूपांत सांठविलेलें असतें; आणि तेंच शरीरसंगोपनाचें मुख्य काम करतें. हें कबूल केल्यावर गहूं श्रेष्ठ कीं तांदूळ श्रेष्ठ या वादाचा उलगडा होतो. यंत्रांत तांदूळ साफ करून त्याला तकाकी आणतात, आणि असा तकाकणारा तांदूळ गिऱ्हाईक पसंत करतो आणि त्याला जास्त दामही देतो. यंत्रांत तांदळाचा दाणा ( polish ) सफाई होत असतांना त्याचें टोंक जेथें व्हिटामिन सांठविलेलें असतें तें हे सफाई होऊन व्हिटामिन निघून जाऊन तांदूळ निःसत्व होतो. यंत्रांत साफ केलेला तांदूळ तकाकणारा व दिखाऊ दिसतो; पण सत्वहीन असतो. उखळींत कांडून साफ केलेला तांदूळ, मजुरीमुळें महाग पडतो. पण त्यांत सत्व असतें.

गव्हाचा प्रकार तसा नाहीं. गहूं दळून त्याचें पीठ झालें, तें पाखडलें, पीठ आणि भुसा निराळा केला, तरी त्याच्या व्हिटामिनचे कण त्या पिठांत आणि भुशांत राहातातच. या उपरांत गव्हांत ( Phosphates ) फॉसफेट्स्या द्रव्यांचा भाग विशेष असतो. या सर्व कारणांमुळें यंत्रांत साफ केलेल्या तांदळापेक्षां गहूं विशेष पौष्टिक पदार्थ आहे.

पाश्चात्य यामुळें आपणा पूर्वस्थ लोकांना भातखाऊ म्हणजे निःसत्व असें म्हणतात व मानतात.

असें जरी आहे तरी ईशकृपेनें तुरीची, मसुरीची, मुगाची वगैरे डाळ भातासोबत आपण खातों. या सर्व डाळीमध्यें वर वर्णन केलेलें व्हिटामिन अबाधित राहातें. त्याचप्रमाणें बाजरी, ज्वारी, जोंधळा, चणे, वाल, वाटाणे, भुईमुगाच्या शेंगा वगैरे वस्तूंचें आपण सेवन करीत असतोंच. या पदार्थांपैकीं केवळ वाटाण्याचाच उपयोग करण्याचें पाश्चात्यांना माहीत आहे, आणि तें देखील ओल्या वाटाण्याचा. सुक्या वाटाण्याची भरड करून क्वचित प्रसंगीं त्याची आंबील अथवा सूप करून पिण्याचें त्यांना माहीत आहे.

चणे खाणें हें त्यांना अत्यंत क्षुद्र वाटतें. हें केवळ पशूंचें खाणें आहे असें ते समजतात. आपण याच चण्याचा किती तरतऱ्हेनें उपयोग करून, रुचकर पदार्थ आणि पक्वान्नें बनवीत असतों !

सारांश Struggle for existence म्हणजे जीवनकलहाच्या आहाराच्या बाबतींत आपण कितीतरी पटीनें त्यांच्यापेक्षां पुढें आणि स्वतंत्र आहोंत ! निसर्गांतल्या किती तरी वस्तु आपण उपयोगांत आणिल्या आहेत, ज्या वस्तूंच्या उपयुक्ततेची पाश्चात्यांना मुळींच कल्पना देखील नाहीं. त्यांचें जें मुख्य व्हिटामिन तें तर आपल्या रोजच्या आहारांतलें आहे. अशा बिकट परिस्थितींत आपण जीवंत राहिलों आहोंत त्याचें कदाचित् एक कारण प्रभुकृपेनें आपल्या आहारामुळें नसेल कशावरून ?

पाश्चात्य लोक मुख्यत्वेंकरून मांसाहारी आहेत. आपल्या देशांतील कांहीं उच्चवर्णीय प्रजेखेरीज गोरगरीब बहुतेक मांस व मासे खाणारे आहेत. तरी आपल्या प्रजेप्रमाणें पाश्चात्यांनाही केवळ मांसावर राहून भागवितां यावयाचें नाहीं. म्हणून त्यांना गहूं पाहिजे. गव्हाचें पीठ मळून, त्यांत ( yeast ) यीस्ट म्हणजे एका प्रकारचें जंतुमय वनस्पतिरूपि द्रव्य, घालतात. जेणेंकरून भाजतांना त्या यीस्टमधल्या जंतूंचा नाश होऊन त्यांचा गॅस म्हणजे हवेंत रूपांतर होऊन त्या भाजलेल्या रोटयांत मध-माशांच्या पोळ्याप्रमाणें असंख्य लहान लहान खोल्या बनतात. त्या खोल्यांच्या भिंती म्हणजे गव्हांचे अत्यंत पातळ असे पापुद्रे. यामुळें हें गव्हांचें अन्न पचन होण्यास सुलभ जातें. हें झालें सामान्य जनतेचें मुख्य खाद्य. याशिवाय गव्हाचे इतर पदार्थ म्हणजे केक व बिस्किटें. हे पदार्थ महाग असल्यामुळें सामान्य जनतेच्या राजरोस उपयोगां-तले नव्हत.

आपल्या इकडल्याप्रमाणें गव्हांच्या पोळया, फुलकें, सत्व, शेव वगैरे पदार्थ त्यांना मुळींच माहीत नाहींत. आतां विशेष गंमत पाहा. हे पाश्चात्य जन जे आपल्याला सुधारणेच्या टोंकावर पोहोंचल्याचा टेंभा मिरवितात, आणि आम्हाला हांसत आहेत, त्यांचें या त्यांच्या मुख्य आहारासंबंधानें अत्यंत परावलंबन कसें आहे तें !

समजा, त्यांच्या देशांत वखारींतून गहूं भरगच्च भरलेला आहे. परंतु कांहीं कारणांनीं अथवा संपामुळें पीठ दळण्याचे अथवा रोटी भाज-ण्याचे कारखाने बंद पडले तर चोवीस तासांत त्यांच्या प्रजेचे जे हाल होतील त्यांचें अनुमान देखील करितां येत नाहीं. तत्काळ बंडाळी माजेल, अत्याचार, खून आणि भयंकर राजक्रांत्या होतील यांत मुळींच संदेह नाहीं. यासाठींच त्यांच्या देशांतल्या मुत्सद्यांची मुख्य खटपट आपल्या रयतेला गहूं स्वस्त दरानें कसे मिळतील, आणि ते तसे मिळावे म्हणून देशांत गहूं पुरत्या प्रमाणांत कसा उत्पन्न होईल, आणि तसें करण्यासाठीं शेतकऱ्यांना

कोणत्या प्रकारची सूट व मदत देतां येईल, याविषयीं डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस त्यांचा प्रयत्न चालू असतो. इतकें करूनही जर त्यांच्या देशांत गहूं पुरत्या प्रमाणांत उत्पन्न होत नसेल तर दुसऱ्यांच्या देशांतून तो किफायतीनें कसा आणवितां येईल, आणि त्यासाठीं त्या देशांबरोबर व्याजबट्टा (Exchange) कसा ठेवितां येईल कीं, जेणेंकरून त्यांच्या देशांतल्या कामकरी प्रजेला रोटी स्वस्त मिळून प्रजा शांत व संतुष्ट राहील!

याच आहाराच्या बाबतींत आपण किती तरी स्वावलंबी व स्वतंत्र आहोंत याचा ज्यानें त्यानें सूक्ष्म विचार करावा. अर्थशास्त्रज्ञ मोठमोठे लेख लिहून आपलें समाधान करावयाचा यत्न करतील कीं, दाणा भरडण्याच्या मोठमाठ्या गिरण्या व भटियारखाने आणि हॉटेलें काढल्यानें रयतेला स्वस्त अन्न मिळून रयत सुखी राहील! अन्न स्वस्त मिळेल हा केवळ तर्क आहे. आणि त्याप्रीत्यर्थ यंत्रसामुग्रीसाठीं किती पैसा अडकून राहील? या सर्व गोष्टींचा विचार करतां, अशा प्रकारच्या परावलंबन स्थितीचें अनुकरण करणें, हें इष्ट आहे काय?

याच दिखाऊ पण दिशाभूल करणाऱ्या विचारसरणीनें आपण कापड, औषधें व रंग या बाबतींत आपल्या उच्च स्थितींतून च्युत होऊन पाश्चात्यांच्या महाग, वेगडी व निरुपयोगी वस्तु वापरण्यास शिकलों आहोंत!!

म्हणून या स्थितीला आपण जाऊं नये हें या लेखाच्या सुरवातीला वर्णन केलेली श्रीसांईबाबांची दळणकांडण रूपि लीला प्रत्यक्ष दाखवीत नाहीं काय? त्यांचा याविषयींचा हेतु स्पष्ट रीतीनें दृग्गोचर होत नाहीं काय?

समजा; त्या वेळीं श्रीसांईबाबांनीं त्यांच्याकडे येणाऱ्या जिज्ञासूंना स्पष्ट रीतीनें सांगितलें असतें कीं, बाबानों, तुम्ही तुमच्या घरीं दळणकांडणादि क्रिया ठेवा, स्वयंपाकावर स्वतः नजर ठेवा! बाजारची

जिन्नस खाऊं नका ! तर निदान लेखकासारखा पाश्चात्य संस्कृतीच्या अर्ध्या हळकुंडानें पिंवळा बनलेला श्रींच्या उपदेशाला "old fashioned" जुन्या पद्धतीचा आणि "useless" म्हणजे निरुपयोगी असें बोलल्या शिवाय राहाता ना !

श्रीसांईमाऊलीनें आपल्या देवळांत जातें ठेवून स्वतः दळून गोर-गरीबांस व क्षुद्र दैवतादि इतरांस त्याच्या पिठाच्या भाकऱ्या भाजून तृप्त केलें याची मुख्य गोम वरील सर्व हकीकतीवरून उघड दिसते ती:—

१ ज्याप्रमाणें घरोघरीं अद्यापि पाटा आणि वरवंटा आहे त्या-प्रमाणें दळावयाचें जातें पण जरूर असलेंच पाहिजे.

२ वेळांत वेळ साधून हौसेनें दळण्याकांडण्याचा प्रघात ठेवावा.

३ आपण सुस्थितींतील माणसें जर याप्रमाणें करूं तर गरीब स्थितींतील लोक आपलें अनुकरण करून गिरण्यांत पीठ दळण्यासाठी जाणार नाहींत. आणि त्यामुळें त्यांचा वेळ आणि पैसा बचून त्यांना सुग्रास अन्न खावयास मिळेल.

४ टेनिस वगैरे खेळ आवडल्यास वेळाशक खेळावे; पण घरीं फुर-सत काढून जात्यावर बसून थोडें तरी दळण्यानें जो व्यायाम होतो, व गाण्याच्या रूपानें देवाची सेवा होऊन जो मानसिक आणि शारीरिक आल्हाद होतो, त्याची तुलना टेनिस वगैरेंच्या व्यायामाबरोबर करून पाहावी.

५ दळण्याच्या संवईमुळें शरीराला व कमरेला योग्य तो व्यायाम मिळून बाळंतपणादि नैसर्गिक गोष्टी जड जात नाहींत.

६ स्वतः दळलेल्या पिठापासून केलेले पदार्थ किती गोड, रुचकर आणि स्वादिष्ट व पौष्टिक असतात हें अनुभवानें कळून आनंद होतो.

७ ही सत्तेच्या गुलामगिरीची गोष्ट नाहीं.खऱ्या प्रेमाची गोष्ट आहे ज्या गोष्टीचा अनुभव श्रींच्या पायांशीं बसून लेखकाला आल्हादकारक रीतीनें आला आहे आणि म्हणूनच तो येथें त्या विषयीं लिहीत आहे.

८ आयुष्यांतले सगळे दिवस सारखे यावयाचे नाहींत म्हणून स्वतःला दळणकांडणासारख्या हुन्नरांची तालीम असल्यास क्वचित् प्रसंगीं गरीब स्थिति प्राप्त झाल्यास ती जड जात नाहीं.

९ यासाठीं स्वावलंबी होऊन कोणत्याही स्थितीला टक्कर देण्यासाठीं आत्मविश्वास उत्पन्न करण्याची ही एक उत्तम तालीम आहे.

१० पाश्चात्यांप्रमाणें आहारासंबंधानें परावलंबी होण्याची मुळींच चिंता नाहीं.

११ मागल्या एका लेखांत दर्शविलेला श्रींच्या भाकिताचा एक भाग सध्यांच उघड दिसावयास लागला आहे कीं, " लोक एकमेकांस फाडफाडून खातील ! "

अशा दिवसांत, ज्याअर्थी आपण सर्वांच्या घरीं दाणागल्ला थोडा फार असतोच, त्याअर्थी घरांत तो दळून पाखडून त्याचा योग्य तो खाद्य पदार्थ बनवून अत्यंत स्वाभिमानपूर्वक, स्वातंत्र्यानें राहातां येईल. रोटीवाला आला नाहीं, आतां काय करावें ही फिकीर राहाणार नाहीं.

जुनें तें **सर्वच** सोनें या विचाराचा लेखक मुळींच नाहीं. पाश्चात्यांपासून उपयुक्त तें आपण जरूर घेतलेंच पाहिजे. मात्र तसें करतांना ज्या आपल्या जुन्या शिकवणींमुळें आपला आत्मविश्वास वाढेल, आपणाला या जगांत राहून ( Struggle for existence ) जीवनकार्यासाठीं खेंचताण, यांत आपल्या जुन्या शिकवणींतून उत्तम तें जरूर जपून ठेवून त्याचें जतन केलें पाहिजे.

इंग्रजींत एक म्हण आहे: " All that glitters is not Gold " जें सर्व झकाकतें तें सोनें नव्हे. " Old is Gold " जुनें तें सोनें. या दोन्ही वाक्यांचा काळजीपूर्वक विचार करून जेणेंकरून आपल्या दरिद्रीनारायणरूपी जनताजनार्दनाची खरी सेवा होईल इकडे खास ध्यान देण्यांत यावें.

वरीलप्रमाणें श्रींच्या पायांपाशीं बसून त्यांची एक लीला अवलोकन करून तिच्यापासून सुचलेले विचार वाचकांपुढें सादर करण्याचें, अत्यंत नम्रतापूर्वक धाडस लेखक करीत आहे, त्याचा हंसक्षीरन्यायानें विचार व्हावा ही विनंती.

ता. १ ऑगस्ट १९३० "म्हातारा"

आज ता. १० ऑगस्ट रोजीं दोनप्रहरीं श्री बाळासाहेब देव, माधवराव देशपांडे व लेखक सांताक्रूझकडे जात असतां वरीलप्रमाणें एक लेख श्री सांईलीलेंत छापावयास जात आहे असें श्री. बाळासाहेब देवांस लेखकानें सांगितलें. त्या वेळीं श्री माधवरावजींनीं श्रींच्या पायापाशीं घडलेल्या वरील हकीकताविषयीं विपुल विवेचन करून, जेव्हां जेव्हां वाऱ्याची सांथ श्री शिर्डीस येई त्या त्या वेळीं वरील प्रमाणें श्री सांईबाबा गहूं दळून त्यांतलें पीठ शिवेंच्या ओढयावर टाकीत असत. आणि तसें करण्याचें प्रयोजन वरील हकीकतीप्रमाणें सांगत असत. आणि तसें न केलें तर "तुझ्या गांवांत पराड मुडदे पाडीन" अशी त्या देवतांची धमकी असे. असेंही श्री म्हणत असत, असें श्री माधवरावजी म्हणाले.

"म्हातारा"

# अनुभव

॥ श्री सांईबाबा प्रसन्न ॥

ठाणें ता. १७-९ ३०.

सप्रेम शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. मी खालीं देत असलेल्या माझ्या अनुभवास श्री सांई लीलेच्या एखाद्या अंकांत जागा द्यावी.

" बाबा ब्रह्मीभूत झाल्यानंतर सुद्धां आपल्या भक्तांच्या हांकेला धांवत येऊन त्यांचें संकटांतून रक्षण कसें करितात ह्याचा अनुभव मला एकदोन महिन्यांपूर्वीं आला तो असा. माझ्या दोन मुलींना ( वय वर्षें १० व ८ ) सुमारें दोन वर्षांपासून केसांत उवा पडल्यामुळें फार त्रास होत होता. व त्यामुळें त्या दोघीही वारंवार आजारी पडत असत. घरचे, डॉक्टरचे व गांवठी औषधांचे सर्व उपाय केले व शेवटचा उपाय म्हणून मोठ्या मुलीचे केंस साफ बारीक करून टाकले. तरी पण केस थोडेसे वाढल्यानंतर पुनः उवांचा त्रास सुरू झाला. एके दिवशीं दोन्ही मुली स्नान करून आल्यानंतर मीं त्यांना बाबांच्या छबीपुढें उभ्या राहून " जर आमच्या उवा एकदम नाहींशा झाल्या तर आपल्या पुण्यतिथीस ५ रुपये पाठवूं " अशी प्रार्थना करावयास सांगितली. त्याप्रमाणें दोन्ही मुलींनीं प्रार्थना केली. तावडतोब पंधरा दिवसांच्या आंत दोघींच्याही डोकींतून उवा, लिखा, वगैरे साफ नाहींशा झाल्या व आतां उवांचा अंश सुद्धां त्यांच्या केसांत दिसत नाहीं व आज दोन महिने दोघींचीही प्रकृति उत्तम आहे.

बाबांच्या चरणांचा दासानुदास

**शांताराम धोंडु सामंत.**

ता. क.:—आज रोजीं रंगनाथ विश्वनाथ सामंत ह्यांच्या नांवें १७ रुपयांची मनिऑर्डर केली आहे. त्या १७ रुपयांपैकीं वर नमूद केलेले ५ रुपये माझे, १० रा. रंगनाथ विश्वनाथ सामंत ह्यांचे व २ रुपये बापू बाबाजी माळगांवकर यांचे आहेत. एकंदर १७ रुपये बाबांच्या पुण्यतिथीकरितां पाठविले आहेत त्यांचा स्वीकार करावा. कळावें.

आपला

**शांताराम धोंडु सामंत.**

## ॥ श्री सद्गुरु साईनाथ प्रसन्न ॥

श्री शिर्डी ता १-९-३०.

कृ. शि. सा. न. वि. वि.

श्री समर्थ सद्गुरु साईमहाराज यांची पुण्यतिथि येत्या आश्विन शु० १० गुरुवार (विजयादशमी) शके १८५२ ता. २-१०-३० रोजीं श्रीक्षेत्र शिरडी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या मित्रमंडळीसह व कुटुंबांतील मंडळीसह तीर्थप्रसादास अवश्य यावें, अशी विनंती आहे.



सदर्हू कार्यासाठीं खालीं लिहिलेल्या पत्त्यावर कृपा करून वर्गणी अवश्य पाठवावी.

(१) श्री. रामचंद्र आ. तर्खड, १०, जर म्यान्शन, बांद्रें, (२) श्री. बी. व्ही. देव, स्टेशन रोड, ५२, ठाणें, (३) श्री. सु. दि. नवलकर, प्रिन्सेस स्ट्रीट, पोलीस स्टेशनजवळ, मुंबई, (४) श्री. बापूराव बोरावके शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर.

आपले,

केशव गोपाळ बुट्टी, सभासद, — मोरेश्वर विश्वनाथ प्रधान, ट्रस्टी,
सुंदरराव दिनानाथ नवलकर, सेक्रेटरी. — रामचंद्र आत्माराम तर्खड, खजिनदार,
लक्ष्मण गणेश महाजनी, ट्रस्टी, — बाळकृष्ण विश्वनाथ देव, ट्रस्टी.

### उत्सवाचा कार्यक्रम.

ता. २-१०-३०, आश्विन शु. १०, गुरुवार,
सकाळीं:—संस्थानचा रुद्राभिषेक व पवमानाभिषेक, मंगलस्नान, पूजा, आरती.
दुपारीं:—भोजन, पुराण, कीर्तन.
सायंकाळीं:—भजन.

ता. ३-१०-३०, आश्विन शु. ११, शुक्रवार,
सकाळीं:—संस्थानचा अभिषेक, स्नान, पूजा, आरती.
दुपारीं:—फराळ, किंवा भोजन व पुराण.
सायंकाळीं:—रथाची मिरवणूक (किंवा चावडी) भजन.

ता. ४-१०-३०, आश्विन शु. १२, शनिवार.
सकाळीं:—संस्थानचा अभिषेक, स्नान, पूजा, आरती व काल्याचें कीर्तन.
दुपारीं:—पुराण, नंतर ग्रामभोजन.
सायंकाळीं:—चावडी (किंवा रथाची मिरवणूक), भजन.

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।≈ मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला**

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जागरण व मानसिक
श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] ब्राह्मी तेल [ सावध रहावें.

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांचा ०/१४; बाळंत काढा नं. २ दहा दिवसांनंतर ०/१४; बाळकडू:-मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ०/८; कुमारी आसव लहान मुलांकरितां ०/१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही
ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १/१० } **द्राक्षासव** { अर्धा रत्तल ०/१४
दीड रत्तल २/४ } { ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" हीं सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स

आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ × २२२७८. दुकान दवाखाना ठाकुरद्वार मुंबई नं० २.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई
येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून
रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.